हितगुज

# कापूस उत्पादकांनी सद्य:स्थितीचा पुरेपूर लाभ मिळवावा

**डॉ. बी.डी. जडे**
वरिष्ठ कृषिविद्या शास्त्रज्ञ,
जैन इरिगेशन सिस्टीम्स लि.,
जळगाव



ज्यांच्या कापूस पिकामध्ये ठिबक नाही आणि जमिनीत ओल भरपूर आहे, त्यांनी १०:२६:२६ रासायनिक खत १ बॅग, युरिया १ बॅग द्यावे. खते मातीने झाकून द्यावीत. तसेच विद्राव्य खते १३:४०:१३ आणि ०:५२:३४ ची फवारणी करावी. याकरिता साधारणपणे २ ते २.५ हजार रुपये खर्च येईल. त्यापासून एकरी २ ते ३ क्विंटल उत्पादन मिळू शकले तर ७००० रुपये प्रतिक्विंटल दराने १४ ते २० हजार रुपये मिळतील. त्यातून सर्व खर्च ४५०० रुपये वजा केल्यास १० ते १५ हजार रुपये एकरी नफा मिळू शकेल.

कापूस उत्पादक शेतकरी बंधूनी अजूनही कापूस पिकामध्ये उत्तम व्यवस्थापन केल्यास चांगले उत्पादन आणि आर्थिक फायदा मिळणे शक्य आहे.

कापसाचे पीक शेतामध्ये उभे आहे, काही अपवाद वगळता एक ऑक्टोबरपासून राज्यातील पाऊस ओसरला असून तापमान वाढू लागले आहे. त्यामुळे कापसाची बोंडे चांगली फूटू लागली आहेत, बऱ्याच ठिकाणी कापूस वेचण्याच्या कामाने वेग घेतला आहे. शेतकरी बंधूंनी उमललेली कापसाची बोंडे वेचून घ्यावी. कापसाच्या झाडांवर काही पात्या, फुले नि बोंडेही असणार आहेत. अजूनही तीन ते चार महिने हातात आहेत. अजूनही कापसाचे उत्पादन मिळविता येईल. सकारात्मक विचार करावा आणि आलेल्या संधीचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा असे वाटते.



सातत्याने झालेल्या पावसामुळे कापूस पिकामध्ये पात्या, फुलगळ व बोंड सड यामुळे उत्पादनात घट येणार आहे. यावर्षी सततच्या पावसामुळे जमिनीतील अन्नद्रव्ये निचऱ्याद्वारे झिरपून गेली आहेत. त्यामुळे कापूस पिकाला पोषणाची गरज आहे. म्हणून ज्या शेतकऱ्यांचे कापूस पीक ठिबक सिंचन पद्धतीवर आहे त्यांनी ठिबकमधून युरिया ३ किलो, १२:६१:० – २ किलो आणि पांढरा पोटॅश – १ किलो प्रतिएकर एकत्रित आठवड्यातून दोन वेळा देणे गरजेचे आहे. तसेच मॅग्नेशियम सल्फेट ५०० ग्रॅम आणि चिलेटेड सूक्ष्म अन्नद्रव्ये २५० ग्रॅम आठवड्यातून एक वेळा द्यावीत. कापूस पीक संपण्याच्या आधी १५ – २० दिवस ठिबकमधून पाणी आणि खते देणे बंद करावे. पिकाची मुळे अधिक कार्यक्षम होण्याकरिता ठिबकमधून ह्युमिक ॲसिड २ लिटर सोडावे. यामुळे ठिबकवरील कापसाचे एकरी ५ ते ७ क्विंटल उत्पादन मिळणे शक्य आहे.

यावर्षी कापसाचे उत्पादन कमी आणि मागणी जास्त असल्याने कापसाचे दर तेजीत असणार आहेत. शेतकऱ्यांनी कापूस विक्रीची खूप घाई न केलेले चांगले. या परिस्थितीचा शेतकऱ्यांनी फायदा घेतला पाहिजे. कापसाच्या उभ्या पिकासाठी थोडासा खर्च केला तर चांगला आर्थिक फायदा मिळू शकेल असे वाटते. ठिबकवरील कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी ७– ८ हजार रुपये खर्च केल्यास जानेवारी अखेरपर्यंत एकरी ५–६ क्विंटल उत्पादन मिळू शकेल. ७००० रू प्रतिक्विंटल दराने ३५– ४० हजार रुपये मिळू शकतील. त्यातून ८– १० हजार असा खर्च वजा केल्यास निदान २५ ते ३० हजार आर्थिक नफा मिळणे शक्य आहे. शेवटी शेती हा व्यवसाय आहे, हे लक्षात घेऊन गुंतवणूक केल्याशिवाय फायदा मिळणार नाही, खर्च करावयाचा की नाही हे आपण ठरवावे.

ज्यांच्या कापूस पिकामध्ये ठिबक नाही आणि जमिनीत ओल भरपूर आहे, त्यांनी १०:२६:२६ रासायनिक खत १ बॅग, युरिया १ बॅग द्यावे. खते मातीने झाकून द्यावीत. तसेच विद्राव्य खते १३:४०:१३ आणि ०:५२:३४ ची फवारणी करावी. याकरिता साधारणपणे २ ते २.५ हजार रुपये खर्च येईल. त्यापासून एकरी २ ते ३ क्विंटल उत्पादन मिळू शकले तर ७००० रुपये प्रतिक्विंटल दराने १४ ते २० हजार मिळतील. त्यातून सर्व खर्च ४५०० रुपये वजा केल्यास १० ते १५ हजार रुपये एकरी नफा मिळू शकेल.

बुरशीयुक्त रोगापासून तसेच बोंडसडीच्या नियंत्रणाकरिता कॉपर ऑक्सिक्लोराईड २५ ग्रॅम आणि स्ट्रेप्टोसायक्लिन १ ग्रॅम हे १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. गुलाबी बोंडअळीच्या नियंत्रणाकरिता एकात्मिक कीड व्यवस्थापनाचा अवलंब करताना शेतात एकरी ५ कामगंध सापळे लावावेत. निंबोळी अर्काची फवारणी करावी. नंतर आठवड्याने प्रोफेनोफॉस किंवा थायोडिकार्बची किंवा सायपरमेथ्रिनची फवारणी करावी. प्रकाश सापळे लावावेत. कापसाच्या फुलांचे निरीक्षण करा आणि असलेल्या डोमकळ्या तोडून नष्ट कराव्यात. गुलाबी बोंडअळीच्या प्रादुर्भावाकडे दुर्लक्ष अजिबात करू नका. रस शोषण करणारी किडी मावा, तडतुडे, फुलकिडे, पांढरी माशी नियंत्रणाकरीता पिवळे, निळे चिकट सापळे लावावेत तसेच आंतरप्रवाही कीटकनाशकांची फवारणी करावी. यामुळे कापसाचे उत्पादन निश्चितच चांगले मिळेल.

कापूस पिकाचे योग्य व्यवस्थापन केल्यास कापूस पिकापासून अधिक उत्पादन मिळते. कापूस पिकामध्ये नवीन पात्या, फुले येत असतात, येणाऱ्या बोंडांचे योग्य पोषण केल्यास बोंडांना चांगले वजन मिळाल्याने उत्पादनात वाढ होते. शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त जानेवारीअखेरपर्यंत कापूस पीक संपवावे. कापसाचे कोणतेही अवशेष शेतात राहणार नाहीत याची काळजी घ्यावी. जे शेतकरी आपल्या कापूस पिकाचे व्यवस्थापन करतील त्यांना त्याचा निश्चितच फायदा होईल. आलेल्या संधीचा लाभ शेतकरी बंधूंनी घ्यावा असे वाटते. ■